**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. रमणप्रित सिंग
सनशाईन पार्क, फ्लॅट नं.५, बालेवाडी, पुणे-४५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपायुक्त,
चतुशृंगी पोलीस स्टेशन, पुणे -५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस आयुक्त,
चतुशृंगी पोलीस स्टेशन, पुणे -५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७२+२३५६+७१७/२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.१०.२००७/ पुणे |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रमणप्रित सिंग
सनशाईन पार्क, फ्लॅट नं.५, बालेवाडी, पुणे-४५

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपायुक्त,
चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे -५

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस आयुक्त,
चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे -५

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १९७२ | दि.२६.०२.२००८ | दि.२९.०२.२००८ | दि.०५.०४.२००८ | दि.- |
| २३५६ | दि.२६.०२.२००८ | दि.२७.३.२००८ | दि.२३.०५.२००८ | दि. |
| ७१७/२००९ | दि.१३.०४.२००९ | दि.१९.०५.२००९ | दि.२७.०५.२००९ | दि. |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्रमांक १९७२** : दि.०७.०८.२००७ ला दिलेल्या तक्रारीची कॉपी मला पाहिजे आहे. पण कंट्रोलने लेखी जबाबदार आरोपींना त्यांनी पोलीस निरीक्षकांच्या समोर हजर केले. पोलीस निरीक्षकांनी त्यांच्यावर काय कारवाई केली त्याची मला कॉपी पाहिजे आहे.

**अपील क्रमांक २३५६ :** दि.१९.१२.२००७ ला दिलेली तक्रार अर्जावर डी.जी.पी., मुंबई यांनी पोलीस कमिशनर यांना पाठविलेल्या प्रतीची कॉपी पाहिजे आहे.

**अपील क्रमांक ७१७/२००९ :** औंध पोलीस स्टेशनचे माजी पी.आय.श्री.शेषराव सूर्यवंशी यांच्या विरुध्द आजतागायत दाखल असलेल्या विविध तक्रारीबाबतचा तपशील व त्या विविध तक्रारींबाबत झालेल्या कार्यवाहीचा तपशील.

## विवेचन

पोलीस नियंत्रण कक्षाला आपण दूरध्वनीवरून दिलेल्या तक्रारीबाबतची कार्यवाही, तसेच चतु:श्रृंगी पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.शेषराव सूर्यवंशी यांच्याविरूध्द दाखल असलेल्या तक्रारी आदी माहिती आपण मागितली होती. परंतु ती विलंबाने, अपुरी व चुकीची दिली. आपल्या तक्रारीवर पोलिसांनी योग्य कार्यवाही केलेली नाही. तसेच श्री.सूर्यवंशी यांनी पक्षपातीपणे कार्यवाही केली आहे. त्यांच्याविरूध्द फक्त आपण केलेल्या तक्रारींची माहिती दिली.

सर्व तक्रारींची माहिती आपण मागितली होती, ती दिलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.रमणप्रित सिंग यांनी केले.

पोलीस नियंत्रण कक्षाकडे श्री.रमणप्रित सिंग यांनी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती त्यांना देण्यात आली. पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडे श्री.सूर्यवंशी यांच्याविरुध्द त्यांनी केलेल्या अर्जानुसार चौकशी करून पोलीस आयुक्त, पुणे यांना सादर केलेल्या अहवालाची माहितीही त्यांना देण्यात आली. याच अहवालात श्री.रमणप्रित सिंग यांनी केलेल्या सर्व अर्जांचा समावेश करण्यात आला होता. श्री.सूर्यवंशी यांची सेवा विविध ठिकाणी झाली आहे. त्या सर्व ठिकाणी त्यांच्याविरूध्द काही तक्रारी झाल्या असल्यास त्यांची माहिती संकलित स्वरुपात नसते. त्यामुळे उपलब्ध तक्रारींबाबतची माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.एस.पी.कराडे व अपिलीय प्राधिकारी डॉ.महेश पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री.रमणप्रित सिंग हे श्री.सूर्यवशी यांच्या विरोधात विविध ठिकाणी अर्ज व तक्रारी करीत असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. अशा स्वरूपाचे श्री.रमणप्रित सिंग यांचे एक अपील (अ.क्र.३०४८) आयोगाने यापूर्वी (दि.१३.५.२००९) निकाली काढले आहे. अपीलकर्ता एकाच पोलीस अधिकाऱ्याविरूध्द तक्रारी व माहितीच्या अधिकारातील अर्ज करीत असल्याचे त्यातून दिसते. श्री.सूर्यवंशी यांच्याविरूध्दच्या तक्रारींबाबत मागितलेली माहिती ही नेमकी नाही. विशिष्ट कालावधी नमूद करून मागणी केलेली नाही. तथापि गेल्या पाच वर्षात श्री.सूर्यवंशी यांच्याविरूध्द पोलीस आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयात आलेल्या तक्रारींच्या प्रती अपीलकर्त्यास देण्याचे आयोगाचे निर्देश जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांना श्री.महेश पाटील, उपायुक्त, परिमंडळ-३, पुणे यांनी कळवावे व तसे केल्याचे आयोगास अवगत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, प्रशासकीय विभाग, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांनी श्री.सूर्यवंशी यांच्याबाबत गेल्या पाच वर्षांत पोलीस आयुक्त कार्यालयात दाखल असलेल्या तक्रारींच्या प्रती अपीलकर्ता श्री.रमणप्रित सिंग यांना द्याव्यात. आयेगाचा आदेश प्राप्त झाल्यापासून याची पूर्तता आठ दिवसात करून आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
दि.३०.१०.२००९

**प्रत::** जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, प्रशासकीय विभाग, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांना योग्य त्या कारवाईसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहन जोतीराम देवकर
मु.भांडली खुर्द, पो.सासकल, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सा.प्र.), पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९ /सातारा / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.८ .२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मोहन जोतीराम देवकर
मु.भांडली खुर्द, पो.सासकल, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सा.प्र.), पुणे विभाग, पुणे
**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. — |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. — |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

तहसीलदार, फलटण, जि.सातारा यांनी सरकारी भाडेपट्टा दिलेला आदेश क्र.६६५५६३/१९७१, दि.२३.८.१९७१

## विवेचन

तहसीलदार, फलटण, जिल्हा सातारा यांनी सरकारी भाडेपट्टा दिल्याची सन १९७१ मधील आदेशाची प्रत न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.मोहन जोतीराम देवकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अतिक्रमण नियमानुकूल करुन मिळावे, ही आपली मुख्य मागणी आहे. त्याबाबत १९८६ साली आपण दाखल केलेल्या अपिलात संबंधित कागदपत्र आहेत, असे प्रतिपादन श्री.देवकर यांनी केले. परंतु श्री.देवकर यांनी सन १९७१ ची सनद मागितली होती. ती 'ब' वर्गातील कागदपत्र असल्यामुळे तीस वर्षांनंतर नाश केलेली आहेत. तसे श्री.देवकर यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. भाडेपट्टा कायम करावा, अशी श्री.देवकर यांची मूळ मागणी होती. या संदर्भात त्यांनी विविध पातळ्यांवर केलेली सर्व अपिले आजपर्यंत फेटाळण्यात आली आहेत. त्याबाबत त्यांची तक्रार राहिलेली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.सुभाष धर्माधिकारी यांनी नमूद केले. आपण मागणी केलेला आदेश अभिलेख कक्षात आढळून येत नाही, याबाबत आपली खात्री झालेली आहे. सदर आदेशाची छायांकित स्वरुपातील प्रत आपल्याकडे आहे. अतिक्रमण नियमानुकूल प्रस्तावाबाबत आपण स्वतंत्र अर्ज करीत असल्यामुळे माहितीच्या अधिकाराबाबत आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे श्री.देवकर यांनी लेखी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

डॉ. विश्वास पाटील
स.नं.४७३/ अे, कुंजबन सोसायटी, हरेकृष्ण मंदिर पथ,
मॉडेल कॉलनी, पुणे- ४११ ०१६

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१२ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.८.२००८ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. अनिरूध्द घन:श्याम पावसकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.४.२००८ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

शिवाजीनगर, पुणे येथील पुणे महानगरपालिकेच्या एका अंतर्गत रस्त्याबाबतची माहिती सातत्याने मागूनही आपल्याला मिळत नाही, तसेच हा रस्ता ताब्यात घेण्याची व त्यावरील अतिक्रमण दूर करण्याच्या संदर्भातील तक्रारीवर कारवाई केली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता डॉ. विश्वास पाटील यांनी केले.

संदर्भीय रस्ता ताब्यात घेण्याबाबत पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने अंतर्गत रस्ता मिळकतीत समाविष्ट करण्याबाबत ठराव केला होता. त्याप्रमाणे शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता,परंतु शासनाने तो नामजूंर करून रस्ता कायम ठेवावा असे ठरले. दरम्यानच्या काळात या प्रकरणी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाली व न्यायालयाने परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश दिला. या दाव्याचा निकाल लागेपर्यंत पुढील कार्यवाही करता येणार नाही याची माहिती डॉ. पाटील यांना देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. मदन रामचंद्र आढारी यांनी केले. मात्र आपल्याला काही कागदपत्रांच्या प्रती दिल्या जात नसल्याचे व त्या जाणीवपूर्वक गहाळ करण्यात आल्याचे प्रतिपादन डॉ. पाटील यांनी केले. डॉ. पाटील यांना सर्व संचिका दाखविण्यात आल्या असून त्यातील काही कागदपत्रे पूर्वी आपण पाहिली असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्याचा कोणताही पुरावा त्यांनी दिलेला नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. अनिरूध्द पावसकर यांनी नमूद केले. या विषयातील सर्व अभिलेख डॉ. पाटील यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती नि:शुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. ३०.८.२००८ रोजी त्यांना सर्व अभिलेख दाखविण्यात आले. आपल्याला हवी असलेली कोणतीही कागदपत्रे त्यात नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर डॉ.

पाटील यांनी दि. ३०.७.२००९ अन्वये पुन्हा या संदर्भात अर्ज केला, त्यावर त्यांना दहा संचिका दाखविण्यात आल्या व त्यांच्या मागणीनुसार ४२ कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात आल्या, तसेच दि. २५.८.२००९ रोजी या संचिकांमधील १५० पानांच्या छायांकित प्रती त्यांच्या मागणीनुसार देण्यात आल्या, असे अपिलीय प्राधिकारी श्री. मदन रामचंद्र आढारी यांनी दि. १८.९.२००९ च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहित्ती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २२.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.संजय खंडुजी खरात
द्वारा-श्री.डी.व्ही.भांगरे, स.नं.३१/१,
मिलिंद निवास, चौधरी नगर, धानोरी, पुणे-४११ ०१५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक,
भूमी अभिलेख पुणे - ४११ ००१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
आंबेगाव(घोडेगाव), जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय खंडुजी खरात
द्वारा-श्री.डी.व्ही.भांगरे, स.नं.३१/१, मिलिंद निवास,
चौधरी नगर, धानोरी, पुणे-४११ ०१५

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक,
भूमी अभिलेख पुणे - ४११ ००१ प्रतिनिधी श्रीमती.सु.अ.भावसार

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ श्री.एस.एस.इंदलकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.०१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.०२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०७.०३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.०४.२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br><br>मौजे आमोंडी, ता.आंबेगाव, जि.पुणे येथील स.नं.३६२ हि.नं.१ मध्ये १ अ ह्या जमिनीच्या फाळणी बाराबाबतची माहिती. | |

## विवेचन

फाळणीबाराच्या अनुषंगाने जमीन एकत्रीकरण योजनेपूर्वीचा, म्हणजेच सन १९७४ पूर्वीचा मालकी हक्काबाबतचा पुरावा आपण जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ यांच्याकडे मागितला होता. फाळणीबारा फेरफारात एकत्रीकरण योजनेत चुकीची नावे दाखल झालेली आहेत. त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये १९९५ साली अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडे दाखल केलेल्या अपिलात १९९८ साली दिलेला निर्णय चुकीचा असून बनावट दस्तऐवज खरा मानून हा निर्णय दिला आहे. हीच माहिती देणे अथवा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्या निर्णयाविरुध्द दिवाणी न्यायालयात दाद मागण्यास सांगणे ही दिशाभूल आहे. तसेच आपण दि.२२.१.२००८ रोजी केलेला अर्ज अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे कार्यालयाने तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, आंबेगाव(घोडेगाव) यांच्याकडे वर्ग केला. त्यांनी कोणतीही माहिती दिली नाही, म्हणून आपण अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडे अपील केले. एकत्रीकरण योजना, फिल्ड बुक व अनुषंगिक अभिलेखाच्या आधारे व एकत्रीकरण योजनेतील कार्यपध्दतीच्या आधारे अपीलकर्त्याला १५ दिवसात माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे श्री.बा.वा.वानखेडे यांनी दि.२३.४.२००८ रोजी दिला. तरीही तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, आंबेगाव(घोडेगाव) श्रीमती पी.एम.लोहोकरे यांच्याकडून माहिती मिळाली नाही, म्हणून आपण

अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे तक्रार केली. त्यांनी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, आंबेगाव(घोडेगाव) यांना स्मरणपत्र व परिणामाची जाणीव देऊनही श्रीमती लोहोकरे यांनी कोणतीही माहिती दिली नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री.खरात यांनी केले.

संबंधित संचिका अभिलेखात उपलब्ध होत नाही. एकत्रीकरण योजनेबाबत श्री.खरात यांना पत्र दिले होते. पोटहिस्सा मोजणी होऊन फेरफाराचा अंमल झाला. परंतु गुणाकार बुक सन १९९२ पूर्वीचे उपलब्ध नाही. कार्यालये बदलत गेली. त्यामुळे अभिलेख उपलब्ध होणे शक्य होत नाही. सन १९७४ पूर्वीचे अभिलेख मागितले असल्यामुळे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, आंबेगाव(घोडेगाव) यांच्याकडे अर्ज वर्ग केला. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश दिल्यानंतर तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, आंबेगाव(घोडेगाव) श्रीमती लोहोकरे यांना स्मरणपत्रे पाठविली तरीही त्यांनी उत्तर दिले नाही. दरम्यान याच अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाच्या कार्यवाहीबाबतचा अहवाल दि. २९.८.२००८ च्या पत्रान्वये मागविला होता. त्यानंतर अधीक्षक भूमी अभिलेख,पुणे श्री.बा.वा.वानखेडे यांनी दि.६.९.२००८ रोजी श्रीमती लोहोकरे यांना माहिती न दिल्याबद्दल आपणांस वैयक्तिक जबाबदार धरण्यात येईल, असे कळविले व श्रीमती लोहोकरे यांना कारणे दाखवा नोटीस दिली. माहिती उपलब्ध होत नसल्याचे दि.८.८.२००८ रोजी श्री.खरात यांना कळविण्यात आले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, आंबेगाव श्री.एस.एस.इंदलकर यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, आंबेगाव(घोडेगाव) श्रीमती लोहोकरे यांनी श्री.खरात यांना विहित मुदतीत उत्तरही पाठविलेले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी स्मरणपत्रे पाठविली व कारणे दाखवा नोटीस दिली. 'आपण जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख या जबाबदार पदावर काम करीत असताना अर्जदार यांना माहिती पुरविण्याची टाळाटाळ करीत असल्याचे निष्पन्न होत आहे,' असे कारणे दाखवा नोटिशीत स्पष्ट नमूद केले आहे. श्री.खरात यांना दोन दिवसात माहिती पुरविण्याचा आदेश या नोटिशीत दिला असून त्याची

पूर्तता झाली नसल्याची जाणीव दि.१५.१०.२००८ च्या पत्रान्वये अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी श्रीमती लोहोकरे यांना करुन दिली आहे. दरम्यान, 'सन १९७४ पूर्वीचे कागदपत्र फेरफार कोणत्या अभिलेखाच्या आधारे लागले याचा अर्थबोध होत नसल्याने पुरविता येत नाही,' असे दि.१४.१०.२००८ च्या पत्रान्वये श्रीमती लोहोकरे यांनी श्री.खरात यांना कळविले. आयोगाच्या विचारणेनंतर श्रीमती लोहोकरे यांनी दि.७.१.२००९ रोजी आयोगाला निवेदन सादर केले. 'मौजे आमोंडी, ता.आंबेगाव, जि.पुणे स.नं.३६२ चा १अ, गट नं.१३७१ बाबत अधीक्षक भूमी अभिलेख, पुणे यांचे कोर्टात अपील क्र.१६५/१९४/१९९५, दि.२३.११.१९९४ अन्वये निर्णय झालेला असून अपीलदार श्री.रमाजी श्रीपती बारणे व गुलाब खंडू खरात यांचे अपील फेटाळणेत आलेले आहे. अपीलदार यांनी आपले कब्जाहक्काबाबत योग्य त्या दिवाणी न्यायालयातून दाद मागून घ्यावी असा निर्णय दिलेला आहे. या निर्णयाचे अनुषंगाने सदर निर्णय सदोष आहेत किंवा नाही याबाबत मत व्यक्त करण्याचा अधिकार या कार्यालयास नसलेने आपल्या स्तरावर अर्जदार यांना कळविणेस नम्र विनंती आहे,' असे या निवेदनात श्रीमती लोहोकरे यांनी म्हटले आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता आयोग पुढील निष्कर्षाप्रत येत आहे:

अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी मूळ अर्ज तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, आंबेगाव(घोडेगाव) श्रीमती प्र.मो.लोहोकरे यांच्याकडे वर्ग करुन माहिती देण्याच्या सूचना दिल्यानंतर त्या जन माहिती अधिकारी म्हणून माहिती देण्यास जबाबदार ठरतात. ही जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही. श्रीमती लोहोकरे यांनी माहिती देण्याबाबत टाळाटाळ केली असून अनास्थाच दर्शविली आहे. विषयांकित फेरफार कायदेशीर की बेकायदेशीर, कागदपत्रे खरी की बनावट व त्या आधारे अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी दिलेला निर्णय योग्य की अयोग्य, याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. त्यासाठी नियमानुसार स्वतंत्र प्रक्रियेचा अवलंब अपीलकर्त्यास करावा लागेल. मात्र संबंधित अभिलेख कायमस्वरुपी जतनाचे आहेत, हे लक्षात घेता ते उपलब्ध होणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणाने ते उपलब्ध

होत नसल्यास त्याबाबतची माहिती व शोध घेण्याबाबत केलेली कार्यवाही अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविली जावयास हवी होती. परंतु श्रीमती लोहोकरे यांनी यातील कोणतीही कार्यवाही, अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे श्री.बा.वा.वानखेडे यांनी स्मरणपत्र व कारणे दाखवा नोटीस देऊनही केलेली नाही. त्यानंतरच्या (दि.१५.१०.२००८) स्मरणपत्राच्या लगतच्या तारखेलाच (दि.१४.१०.२००८) त्यांनी श्री.खरात यांना उत्तर पाठविले आहे. म्हणजेच श्रीमती लोहोकरे यांनी मुदतीत, परिपूर्ण उत्तर वा माहिती देण्याची कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे त्या शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, आंबेगाव(घोडेगाव) श्रीमती प्र.मो.लोहोकरे यांना रु.२५०००/- शास्ती करण्यात येत आहे. श्रीमती लोहोकरे यच्या नोव्हेंबर २००९ च्या वेतनापासून दि.१०.२.२०१० पर्यंत सलग तीन हप्त्यात ही शास्ती वसूल करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) ' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही श्री.बा.वा.वानखेडे, अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी करुन, तसेच याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंदी घेऊन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६ .१०.२००९**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.सदाशिव धोंडिराम लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०३ व २०५) अपीलकर्ता
(२)श्री.वैभव सदाशिव लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०४)
(३)श्री.विक्रांत सदाशिव लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०६ व २०७)

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३,२०४,२०५,२०६,२०७ /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |

३. उपस्थित

अपीलकर्ता (१)श्री.सदाशिव धोंडिराम लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०३ व २०५)
(२)श्री.वैभव सदाशिव लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०४)
(३)श्री.विक्रांत सदाशिव लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०६ व २०७)

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा प्रतिनिधी श्री.आर.एस.दळवी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.आर.टी.चोरगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.३.२००७ (अ.क्र.२०५/२०७)<br>दि.२.४.२००७(अ.क्र.२०३/२०४/२०६) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.४.२००७ व ६.८.२००७(अ.क्र.२०५/२०७)<br>दि.२८.४.२००७ व ६.८.२००७ (अ.क्र.२०३/२०४)<br>दि.३०.४.२००७ व ६.८.२००७ (अ.क्र.२०६) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. — |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.७.२००७ (अ.क्र.२०३ ते २०७) |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी घेण्यात आली.

उंब्रज ग्रामपंचायतीच्या कक्षेतील बेकायदेशीर बांधकामांच्या अनुषंगाने व आपल्या बांधकामाची नियमानुसार नोंद करण्यात येत नसून वीज आदीसाठी लागणारा ना हरकत दाखला का देण्यात येत नाही, याबाबतची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब

तहसीलदार, कराड यांच्याकडे मागितली होती. परंतु चुकीची व अपूर्ण माहिती दिली जाते, काही मिळकतींचे क्रमांक आदी तपशील दिला जात नाही. काही बाबतीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे कारण सांगून माहिती नाकारली जाते. काही व्यक्तींच्या बेकायदेशीर बांधकामांना संरक्षण दिले जाते व तोच न्याय इतरांना लावला जात नाही. त्यामुळे आपल्यावर अन्याय होत असून गैरकारभार उघड होण्यासाठी माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्त्यांच्या वतीने डॉ.विक्रांत सदाशिव लाटे यांनी केले. अपील क्र.२०५ व २०७ मध्ये आपल्या मागणीनुसार माहिती मिळाली असल्यामुळे ती निकाली काढण्यास हरकत नसल्याचे लेखी निवेदन श्री.सदाशिव धोंडिराम लाटे व डॉ.विक्रांत सदाशिव लाटे यांनी दिले.

ग्रामपंचायतीने दहा वर्षात दिलेल्या बांधकाम परवानगीची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली आहे. संपूर्ण माहितीच्या कागदपत्रांसाठी सुमारे एक लाख रुपये एवढा खर्च येईल, तो भरण्याबाबत अपीलकर्त्यांना कळविण्यात आले आहे. अनेक अर्ज व अपिलांद्वारे ते माहिती मागत आले असून त्या त्या वेळी समक्ष माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कराड श्री.आर.टी.चोरगे यांनी केले. त्या त्या वेळी दिलेल्या माहितीच्या प्रती त्यांनी सादर केल्या. अपीलकर्त्यांची मुख्य मागणी त्यांच्या बांधकामावरील कारवाईबाबतची व ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबतची आहे. त्याबाबतची कारणेही त्यांना लेखी स्वरुपात देण्यात आली आहेत, असेही निवेदन जन माहिती अधिकारी श्री.चोरगे यांनी केले.

अपीलकर्त्याने प्रत्येक अपिलानुसार न मिळालेल्या नेमक्या माहितीचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, कराड यांना सादर करावे, त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तसेच बेकायदेशीर बांधकामांच्या अनुषंगाने प्रत्यक्ष पाहणीवर आधारित अहवाल गटविकास अधिकारी यांनी सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपीलकर्त्यांना माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कराड श्री.आर.टी.चोरगे यांनी सादर केलेला नाही, याबाबत लेखी खुलासा मूळ अहवालासह आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.

(३) उंब्रज येथील बेकायदेशीर बांधकामांबाबतच्या अपीलकर्त्यांच्या तक्रारीनुसार प्रत्यक्ष पाहणीवर आधारित वस्तुस्थितीदर्शक अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती कराड यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.सदाशिव धोंडिराम लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०३ व २०५) अपीलकर्ता
(२)श्री.वैभव सदाशिव लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०४)
(३)श्री.विक्रांत सदाशिव लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०६ व २०७)

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३,२०४,२०५,२०६,२०७ /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.सदाशिव धोंडिराम लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०३ व २०५)
(२)श्री.वैभव सदाशिव लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०४)
(३)श्री.विक्रांत सदाशिव लाटे
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.२०६ व २०७)

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा प्रतिनिधी श्री.आर.एस.दळवी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.आर.टी.चोरगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.३.२००७ (अ.क्र.२०५/२०७)<br>दि.२.४.२००७(अ.क्र.२०३/२०४/२०६) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.४.२००७ व ६.८.२००७(अ.क्र.२०५/२०७)<br>दि.२८.४.२००७ व ६.८.२००७ (अ.क्र.२०३/२०४)<br>दि.३०.४.२००७ व ६.८.२००७ (अ.क्र.२०६) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. — |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.७.२००७ (अ.क्र.२०३ ते २०७) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी घेण्यात आली.

उंब्रज ग्रामपंचायतीच्या कक्षेतील बेकायदेशीर बांधकामांच्या अनुषंगाने व आपल्या बांधकामाची नियमानुसार नोंद करण्यात येत नसून वीज आदीसाठी लागणारा ना हरकत दाखला का देण्यात येत नाही, याबाबतची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब

तहसीलदार, कराड यांच्याकडे मागितली होती. परंतु चुकीची व अपूर्ण माहिती दिली जाते, काही मिळकतींचे क्रमांक आदी तपशील दिला जात नाही. काही बाबतीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे कारण सांगून माहिती नाकारली जाते. काही व्यक्तींच्या बेकायदेशीर बांधकामांना संरक्षण दिले जाते व तोच न्याय इतरांना लावला जात नाही. त्यामुळे आपल्यावर अन्याय होत असून गैरकारभार उघड होण्यासाठी माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्त्यांच्या वतीने डॉ.विक्रांत सदाशिव लाटे यांनी केले. अपील क्र.२०५ व २०७ मध्ये आपल्या मागणीनुसार माहिती मिळाली असल्यामुळे ती निकाली काढण्यास हरकत नसल्याचे लेखी निवेदन श्री.सदाशिव धोंडिराम लाटे व डॉ.विक्रांत सदाशिव लाटे यांनी दिले.

ग्रामपंचायतीने दहा वर्षांत दिलेल्या बांधकाम परवानगीची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली आहे. संपूर्ण माहितीच्या कागदपत्रांसाठी सुमारे एक लाख रुपये एवढा खर्च येईल, तो भरण्याबाबत अपीलकर्त्यांना कळविण्यात आले आहे. अनेक अर्ज व अपिलांद्वारे ते माहिती मागत आले असून त्या त्या वेळी समक्ष माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कराड श्री.आर.टी.चोरगे यांनी केले. त्या त्या वेळी दिलेल्या माहितीच्या प्रती त्यांनी सादर केल्या. अपीलकर्त्यांची मुख्य मागणी त्यांच्या बांधकामावरील कारवाईबाबतची व ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबतची आहे. त्याबाबतची कारणेही त्यांना लेखी स्वरुपात देण्यात आली आहेत, असेही निवेदन जन माहिती अधिकारी श्री.चोरगे यांनी केले.

अपीलकर्त्याने प्रत्येक अपिलानुसार न मिळालेल्या नेमक्या माहितीचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, कराड यांना सादर करावे, त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तसेच बेकायदेशीर बांधकामांच्या अनुषंगाने प्रत्यक्ष पाहणीवर आधारित अहवाल गटविकास अधिकारी यांनी सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपीलकर्त्यांना माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कराड श्री.आर.टी.चोरगे यांनी सादर केलेला नाही, याबाबत लेखी खुलासा मूळ अहवालासह आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.

(३) उंब्रज येथील बेकायदेशीर बांधकामांबाबतच्या अपीलकर्त्यांच्या तक्रारीनुसार प्रत्यक्ष पाहणीवर आधारित वस्तुस्थितीदर्शक अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती कराड यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

१) श्री.पिराजी धर्माजी शेवकर
२) श्री.सुनिल पिराजी शेवकर तर्फे
ॲड. जयराज रामचंद्र विजापुरे
ए/११, महिम्न सोसायटी,
भाग्यश्री, कर्वेनगर, पुणे-५२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण, विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण, विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०४३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.०८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** १) श्री.पिराजी धर्माजी शेवकर
२) श्री.सुनिल पिराजी शेवकर तर्फे
ॲड. जयराज रामचंद्र विजापुरे
ए/११, महिम्न सोसायटी,
भाग्यश्री, कर्वेनगर, पुणे-५२

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण, विकास योजना विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०६.०३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०८.०४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०७.०५.२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>स.नं.२९६, हि.नं.८, शेवकर वस्ती, हडपसर, पुणे-१३ या जागेत बनसोडे व सावंत यांच्याविरुध्द पुणे महानगरपालिका महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३ ची नोटीस दिलेली असून त्या संदर्भात दि.२३.०१.२००८ रोजी बी.सी.ओ./४२५६ व बी.सी.ओ./४२५७ ह्या दोन नोटीसा काढल्या असून त्यानुसार ३० दिवसांची मुदत संपली असून त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात आली आहेत का? व नसल्यास ती फौजदारी कारवाई अजुनही का करण्यात आली नाही? याची संपूर्ण माहितीबाबत | |

## विवेचन

शेवकर वस्ती (हडपसर) या जागेत श्री.बनसोडे व श्री.सावंत यांना दिलेल्या नोटिसांची मुदत संपली असून कारवाई केली का व केली नसल्यास का केली नाही, अशी विचारणा अपीलकर्ता श्री.पिराजी धर्माजी शेवकर व श्री.सुनिल पिराजी शेवकर यांच्यातर्फे ॲड. श्री.विजापुरे यांनी केली होती. जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,पुणे महानरगपालिका, पुणे यांनी कारवाई करण्यात आल्याचे सांगितले, पण पूर्ण माहितीसह लेखी उत्तर दिले नाही. संपूर्ण फाईल दाखवून अपीलकर्त्यास आवश्यक त्या प्रती द्याव्यात, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, विकास योजना विभाग,पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिले. अपीलकर्त्यांनी मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त मागणी अपिलात केली आहे. तसेच भाष्य, खुलासा अन्वयार्थ याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत करता येत नाही. संचिका दाखवून ऊर्वरीत माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,पुणे महानरगपालिका, पुणे यांनी स्पष्ट केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ५ / १०/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**